## चित्रपट - रामशास्त्री

'रामशास्त्री' या ऐतिहासिक चित्रपटात आधी एकच गीत घालायचे असे ठरले होते. तेही छोटा राम आणि त्याची सखी जानकी ही दोघे खेळत असताना. या प्रसंगासाठी आठवले यांनी मराठी चित्रपटगीतात मानाचे स्थान प्राप्त झालेले 'दोन घडीचा डाव याला जीवन ऐसे नाव' हे गीत लिहिले.

जीवनाचे तत्वज्ञान इतक्या सोप्या शब्दात सांगितलेले इतरत्र कुठेही सापडणार नाही.

## चित्रपट - रामशास्त्री

### दोन घडीचा डाव याला जीवन ऐसे नाव

दोन घडीचा डाव याला जीवन ऐसे नाव

जगताचे हे सुरेख अंगण, खेळ खेळूया सारे आपण
रंक आणखी राव, खेळू या रंक आणखी राव
याला जीवन ऐसे नाव.

माळ यशाची हासत घालू, हासत हासत तसेच झेलू
पराजयाचे घाव, झेलू या पराजयाचे घाव
याला जीवन ऐसे नाव.

मनासारखा मिळे सौंगडी, खेळाया मग अवीट गोडी
दु:खाला नच वाव, दु:खाला नच वाव
याला जीवन ऐसे नाव.